# लोक महाविद्यालय, वर्धा

# नमुना प्रशनप्रत्रिका

## विषय : मराठी

# बी. ए. प्रथम वर्ष
# प्रथम सत्र
# नमुना प्रश्नपत्रिका

**वेळ : ३ तास** **एकुण गुण : ८०**

**१) तुम्ही शिकलेल्या लीन्डेच्या आधारे यादवकालीन भाषेचे सौंदर्य सष्ट करा.** **१६**

**किंवा**

महात्मा फुले यांनी भारतीय शेतीच्या स्थितीगतीचे वर्णन कसे कले आहे ?

**२) 'हंस - नल संवाद' या कवितेचे रसग्रहण करा.** **१६**

**किंवा**

केशवसुतांच्या 'स्फुर्ती ' या कवितेतील सामाजिक आशय  स्पष्ट करा.

**३) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येक शंभर शब्दात लिहा** **१६**

**गट 'अ'**

क) लोक आपापसात का कुजबुज लागले व त्यांना ब्राम्हणाने काय उत्तर दिले ?

ख) राजाराम महाराजांनी राज्याचा बंदोबस्त कसा केला ?

ग) देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या 'असे ज्ञानेदव का म्हणतात ?

घ) होनाजी बाळांनी श्रीकृष्णाला कोणकोणत्या नावांनी प्रस्तुत भूपाळीत संबोधले आहे ?

**किंवा**

**गट 'ब'**

च) संस्कृतीविषयी रवींद्रनाथांनी काय म्हटले आहे ?

छ) टिळक लक्ष्मीबाईना कशी मदत करत ?

ज) 'देवदानावा नरे निर्मिले', असे केशवसुत का म्हणतात ?

झ) हुंकार देणाऱ्या रात्रीचे वर्णन बालकवींनी कसे केले आह ?

**४) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा.** **१६**

गट 'क'

त) भाषांतर या मराठीच्या व्यवहारक्षेत्राचे महत्त्व सांगा.

थ) संवाद म्हणजे काय

द) हेतमूलकत म्हणजे काय ?

ध) जाहिरात लेखनाचे महत्त्व सांगा.

**किंवा**

प)	दैनंदिन जीवनातील पत्रलेखनाचे महत्त्व सांगा.

फ)	प्रसार माध्यमांसाठी लेखन करतांना कोणती काळजी घ्यावी लागते ?

ब)	चेतन व अडथळे यांची सापेक्षता स्पष्ट करा.

भ)	'तडजोड' या भाषिक संवादव्यवहाराच्या मूलतत्वाची आवश्यकता सांगा.

**५)	खालील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.	१६**

१)	आध महानुभावीय चरित्रकार कोण ?

२)	साने गुरूजी यांचे संपूर्ण नाव काय ?

३)	संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ कधी लिहिला ?

४)	बालकवींचा जन्म कोणत्या वर्षी झाला ?

५)	आपल्या कोणत्याही प्रकारच्या लेखन व्यवहाराची निर्दोषता कशावर अवलंबून असते ?

६)	सारांश लेखन ही एक कोणती प्रक्रिया आहे ?

७)	प्रत्येक संदेशाची रचना कशी असते ?

८)	खालीलपैकी कोणत्याही गोष्टीला संवाद म्हणता येणार नाही ?

---------------------------

---------------

# बी. ए. प्रथम वर्ष
# द्वितीय सत्र
## नमुना प्रश्नपत्रिका

**वेळ : ३ तास** **एकुण गुण : ८०**

**१) 'पुर्णिया' या पाठातून स्त्रियांच्या सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचे वर्णन लेखक अनिल अवचट यांनी कसे कले आहे ? १६**

**किंवा**

'इरावतीबाईंचे विठ्ठलाशी अजब नाते होते' असे पु.ल. देशपांडे का म्हणतात ?

**२) 'मुक्त पक्षी' या कवितेतून कवी माधव जूलियन यांनी विरहाचे दु:ख कसे वर्णन केले आहे ? १६**

**किंवा**

लोकशाहीयुक्त समाजवादाचे आणि सर्वधर्मसमभावाचे भावपूर्ण चित्रण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कसे केले आहे ?

**३) पुढीलपैकी कोणत्यही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे प्रतयेक शंभर शब्दांत लिहा. १६**

**गट 'अ'**

क) ॲंकी - थएटरमधील इरावतीबाईंच्या दर्शनाचे लेखकाने केलेले वर्णन स्पष्ट करा.

ख) 'समाल'चे स्वभावचित्र थोडक्यात वर्णन करा.

ग) जन्म आणि मृत्यूच्या मध्ये मानवी जगण्याचे वर्णन बहिणाबाईंनी कशाप्रकारे केले आहे.

घ) येउ दे वाणींत माझ्या सूर तुझ्या आवडींचे असे मर्देकर का म्हणतात

**किंवा**

**गट 'ब'**

च) 'संस्कार' या कथेतून खेडेगावातील लोकांची मानसिकता लेखकाने कशी रेखाटली आहे ?

छ) काशीनाथ सपकाळचे स्वभावचित्र रोखाटा.

ज) 'कणा' या कवितेतील नायकवर कोणता प्रसंग ओढवला ?

झ) तुकडोजींच्या मते झोपडीत कोणकोणती सुखे प्राप्त होतात ?

**४) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. १६**

**गट 'क'**

त) पत्र म्हणजे काय ते सांगून पत्राचे प्रकार स्पष्ट करा.

थ) महाविद्यालयाच्या मा. प्राचार्यांना आदर्श शिक्षण पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनपर पत्र लिहा.

द) सारांश लेखन कसे करावे ते थाडक्यात सांगा.

ध) सारांश लेखन म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

प) पत्रलेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

फ) संवाद माध्यम म्हणून पत्रव्यवहाराचे महत्व स्पष्ट करा.

ब) सारांश लेखनासाठी आवश्यक असलेल्या मार्गदर्शक सूचनांचे महत्व विशद करा.

भ) सारांश लेखनाचे फायदे थोडक्यात सांगा.

**५) खालील सर्व प्रश्नांची उत्तर थोडक्यात लिहा.** **१६**

१) इरावतीबाई कर्वे यांना 'काय दीपमाळा आहे।' असे कोण म्हणत असे व का ?

२) रसोड्ययावर येणाऱ्या बायांच्या परिस्थितीचे वर्णन लेखक अनिल अवचट यांनी कसे केले आहे ?

३) 'भावनेला येऊ दे गा, शास्त्र - काव्याची कसोटी' असे मर्देकर का म्हणतात ?

४) पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा' असे नायक का म्हणतो ?

५) अनौपचारिक पत्राचे स्वरूप स्पष्ट करा.

६) कच्च्या मसुद्याचे पुनरावलोकन कसे महत्त्वाचे ठरते ते थोडक्यात सांगा ?

८) अतिम सारांश लेखन कसे करावे ?

----------------------------

----------------

# बी. ए. द्वितीय वर्ष
# तृतीय सत्र
## <u>नमुना प्रश्नपत्रिका</u>

**वेळ : ३ तास** **एकुण गुण : ८०**

**१) 'स्त्री-पुरुष तुलना' या पाठातून ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांचे महत्त्व कसे स्पष्ट केले आहे ?** **१६**

**किंवा**

शिक्षक हाच राष्ट्राचा भाग्यविधाता' अस तुकडोजी महाराज का म्हणतात ?

**२) संत नामदेवांनी आपल्या अभंगातून विठ्ठलाचे वर्णन कसे केले आहे.** **१६**

**किंवा**

'विराणी' या कवितेचे रसग्रहण करा.

**३) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येक शंभर शब्दां त लिहा.** **१६**

**गट 'अ'**

क) 'रुंभणेयाचा दृष्टांता' मधील विनोदाचे स्वरुप स्पष्ट करा.

ख) आपल्या पहिल्या भाषणाचे वर्णन आचार्य अत्रे यांनी कसे कले आहे ?

ग) मोरोपंतांनी मनाचे महत्त्व कसे वर्णन केले आहे ?

घ) कवी यशवंत यांनी शेतकरी स्त्रीचे वर्णन कसे केले आहे ?

**किंवा**

**गट 'ब'**

च) पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी भक्त पुंडलिकाचे महात्म्य कसे वर्णन केले आहे ?

छ) 'शिक्षकाने आजीवन विद्यार्थीच राहिले पाहिजे', असे तुकडोजी महाराज का म्हणतात ?

ज) 'नामा म्हणे अवघे विठ्ठलाची जाले', असे नामदेव का म्हणतात ?

झ) भला जन्म हा तुला लाभला, असे राम जोशी का म्हणतात ?

**४) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दांत लिहा.** **१६**

**गट 'क'**

त) इतिवृत्त म्हणजे काय ? आणि त्याचे प्रकार कोणते ?

थ) अहवालात्मक इतिवृत्ताच्या लेखनाची पद्धती सांगा ?

द) वृत्तपत्रे आणि नियतकालिके यात कोणता फरक असतो ?

ध) बातमीचे लेखन वाङ:मयगुणसंपन्न कधी होऊ शकते ?

**<u>किंवा</u>**

प) अहवालात्मक इतिवृत्ताचे (Report) स्वरूप सांगा.

फ) अहवालात्मक इतिवृत्ताचा नमुना तयार करा.

ब) 'वृत्तसंस्था या राज्ससंस्थेच्या चौथा स्तंभ असतात' असे कोणी व का म्हटले आहे ?

भ) बातमीचे लेखन करतांना वार्ताहाराने काणेकोणती पथ्ये पाळावीत.

**५) खालील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.** **१६**

१) केशीराजबास यांचा काळ कोणता ?

२) पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे जन्मवर्ष कोणते ?

३) 'श्लोक केकावली' या काव्याचे निर्माते कोण ?

४) कवी अनिल यांचे पूर्ण नाव काय ?

५) बंदुकीपेक्षाही कशाची भीती राज्यकर्त्यांना नेहमी वाटत आली आहे ?

६) बातमी लेखन कसे करावे ?

७) स्थुलमानाने इतिवृत्ताचे किती प्रकार पडतात ?

८) इतिवृत्ताची भाषा कशी असावी ?

----------------------------

----------------

# बी. ए. द्वितीय वर्ष
# चतुर्थ सत्र
## नमुना प्रश्नपत्रिका

**वेळ : ३ तास** **एकुण गुण : ८०**

**१) 'तपस्वी' या पाठाच्या आधारे रामभाऊतपस्वी यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडून दाखवा.** **१६**

**किंवा**

'आंबेडकर नव्या भारताचे युग पाहत होते' असे बा.ह. कल्याणकर का म्हणतात.

**२) 'एका नव्या संघार्षात' या नारायण सुर्वे यांच्या कवितेचे रसग्रहण करा.** **१६**

**किंवा**

**३) 'न्यायासाठी' या कुसुम अलाम यांच्या कवितेचे रसग्रहण करा.** **१६**

क) 'निसर्ग जितला उधळया तिकाच कंजुष आहे' असे दुर्गा भागवत का म्हणतात ?

ख) तपस्वीच्या प्रथम भेटीचे वर्णन लेखक पु. भा.ह भावे यांनी कसे केले ?

ग) आपल्या संस्कृतीविषयी कवी नारायण सुर्वे यांनी कोणते भाष्य केले आहे ?

ध) 'वेदनेला अंत नाही अन् कुणाला खंत नाही' असे कवी सुरेश भट का म्हणतात.

**किंवा**

**गट 'ब'**

च) संत माणसांना पुन्हा पुन्हा काय सांगतात ?

छ) महात्मा गांधी आणि आंबेडकर यांच्यात खटके का उडाले ?

ज) 'पाखरांशी  खेळ मी मांडून गावे' असे कवी का म्हणतात ?

झ) 'डोळे' या कवितेत आलेल्या प्रतिमा सांगा ?

**४) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा.** **१६**

**गट 'क'**

त) भाषांतराचे महत्त्व विशद करा.

थ) भाषांतराची पूर्वतयारी कशी करावी ?

द) 'व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविणे हा मुलाखतीचा मुख्य हेतु असतो' स्पष्ट करा.

ध) कोणकोणत्या निमित्ताने मुलाखती घेतल्या जातात ?

**<u>किंवा</u>**

प) भाषांतराचे विविध प्रकार सांगा

फ) लक्ष्यनिष्ठ भांषांतराचे स्वरूप स्पष्ट करा.

ब) मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीला मुलाखत घेण्यापूर्वी कोणती तयारी करावी लागते ?

भ) मुलाखत लेखनाचे तंत्र कोणते ते सांगा.

**५) खालील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. १६**

१) दुर्गा भागवत यांचे जन्मवर्ष कोणते ?

२) भारत सरकारने नारळीकर यांना कोणता किताब दिला ?

३) नारायण सुर्वे यांचे जन्मवर्ष कोणते ?

४) ना. धो. महानोर यांनी कोणती खंडकाव्य लिहिले ?

५) ज्या भाषेत मूळ मजकूर असतो तिला काय म्हणतात ?

६) मराठीतील पहिले वृत्तपत्र कोणते ?

७) अंधश्रद्धा वाढण्याचं प्रमुख कारण काय आहे ?

८) हिंदुंना आजही आधिक काय होणं आवश्यक आहे ?

----------------------------

----------------

# बी. ए. तृतीय वर्ष
# पाचवे सत्र
## <u>नमुना प्रश्नपत्रिका</u>

**वेळ : ३ तास** **एकुण गुण : ८०**

**१) 'सुधारक' काढण्याचा कोणता हेतु आगरकरांनी सांगितलेला आहे ?** **१६**

**<u>किंवा</u>**

'किडलेली माणसे' या प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या कथेचा आशय स्पष्ट करा.

**२) 'पंढरीवर्णन' या कवितेचा भावार्थ उलगडून दाखवा.** **१६**

**<u>किंवा</u>**

कवी ना. ध. देशपांडे यांच्या 'समाधान' या कवितेतील नायकाचे जीवन कष्टप्रद असले तरी ते कशामुळे त्याला सुसह्य होते ? ते सविस्तर लिहा.

**३) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी शंभर शब्दांत लिहा.** **१६**

**गट 'अ'**

क) विवाहाची तयारी का व कशी करण्यात आली ?

ख) कोणत्या कारणांमुळे आगरकरांनी आपला देश मोठा वाटतो ?

ग) 'जे का रंजले गांजले' या अभंगाचा आशय स्पष्ट करा ?

घ) भिमातटाचे वर्णन शाहीर प्रभाकर यांनी कसे कले आहे ?

**<u>किंवा</u>**

**गट 'ब'**

च) परमेश्वर आणि सृष्टी यांनी आम्हाला कोणती शिकवण दिली याचे थोडक्यात वर्णन प्रस्तुत पाठाच्या आधारे लिहा.

छ) चाळीतल्या किडलेल्या माणसांची मने भरून गेली होती. सोदाहरण स्पष्ट करा.

ज) समाधान या कवितेतील नायक कोणती कामे करतो ?

झ) 'कळा ज्या लागल्या जीवा' या कवितेत कवी तांबे यांनी जनरीती चे वर्णन केले आहे ?

**४) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दांत लिहा.** **१६**

**गट 'क'**

त) गौरवग्रंथाचे संपादन यावर टीप लिहा.

थ) वाङ:मय इतिहासाचे संपादन यावर टीप लिहा.

द) संहिता संपादन म्हणजे काय ?

ध) संहिता वाचनात संपादकास कोणती कामगिरी बजवावी लागते.

**<u>किंवा</u>**

**गट 'क'**

प) स्मरणिका संपादनावर टीप लिहा.

फ) संपादनाच्या कामात संपादकास कोणकोणते बारकावे पहावे लागतात ?

ब) टिपणीचे प्रकार सविस्तर लिहा.

भ) टिपणी लिहिण्याची पद्धती व टिपणी लिहितांना घ्यावयाची काळजी विस्ताराने लिहा.

**५) खालील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. १६**

१) गो. ग. आगरकरांच्या मते कोणते जुने दोन देश काळाच्या जबडयातून वाचले आहेत ?

२) विनोबांच्या मते सृष्टीचे काय अमर्याद आहे ?

३) 'अभंगवाणी'चे कवी कोण ?

४) समाधान या कवितेतील नायकास कशाचा निवारा लाभला आहे ?

५) म्हाइंभट्टाचा मराठीतील आद्यसंपादित ग्रंथ कोणता ?

६) विश्वकोशात कोणती गोष्ट महत्त्वाची आहे ?

७) संहिता संपादनाचे काम कसे आहे ?

८) प्रशासन व्यवस्थेचा मुख्य आधार कोणता ?

----------------------------
----------------

# बी. ए. द्वितीय वर्ष
# सहावे सत्र
## नमुना प्रश्नपत्रिका

**वेळ : ३ तास** **एकुण गुण : ८०**

**१) द्रौपदी, भीम आणि अश्वत्थमा यांच्यातील संघर्षमय चर्चेचे वर्णन करा.** **१६**

**किंवा**

‘अन्वरशा फकीर’ या पाठातून अन्वरशा फकिराचे व्यक्तिचित्र स्पष्ट करा.

**२) ‘ही निळी पांढरी’ या कवितेच्या आधारे इंदिरा संतांनी दुपारचे वर्णन कसे केले आहे ?** **१६**

**किंवा**

‘पाऊस’ या कवितेतून स्त्रीच्या मनाची भावनिक अवस्था कशा व्यक्त केली आहे ते स्पष्ट करा ?

३) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची  उत्तरे प्रत्येकी शंभर शब्दात लिहा.

**गट ‘अ’**

क) भीमाला हुरहुर का वाटत होती ?

ख) पक्षी आणि स्त्रियांचे सौदर्य यांचा संबंध सांगा.

ग) ‘ही निळी पांढरी’ या कवितेच्या आधारे तळ्याचे वर्णण करा.

घ) कवीने काळ्या ज्योतीचे वर्णन करशाप्रकारे केलेले आपणास आढळून येते ?

**किंवा**

**गट ‘ब’**

च) नरेंद्र दाभोळकरांनी ‘अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ’ यशस्वी करण्यासाठी कोणते मार्ग सांगितले आहेत ?

छ) निवडणूक जिंकल्यानंतर गावात कोणकोणत्या घटना घडल्या होत्या ?

ज) ‘पाऊस’ या कवी ग्रेसांच्या कवितेतून कोणते दु:ख प्रकट झाले आहे?

झ) कवी नामदेव ढसाळ  दलितांना कोणता सल्ला देतात ?

**४) पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा.** **१६**

**गट ‘क’**

त) २१ व्या शतकाच्या अनुषंगाने ग्रंथपरीक्षणाचे महत्त्व सांगा.

थ) ग्रंथवाचन करतांना महत्वाचे असणारे घटक थोडक्यात लिहा.

द) संगणक संवाद म्हणजे काय ?

ध) मराठी संकेत स्थळ म्हणजे काय ?

**किंवा**

प) शीर्षक कसे असायला पाहिजे.

फ) ग्रंथाची मुख्यपृष्ठे कशी असावी.

ब) इंस्टंट मेसेजिंग म्हणजे काय ? स्पष्ट करा.

भ) इंस्टंट मेसेजिंग फायदे व तोटे लिहा.

**५) खालील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.** **१६**

१) 'चक्र' या पाठाचे लेखक कोण आहेत ?

२) मारुती चितमपल्ली यांचा जन्म कधी झाला ?

३) इंदिरा संत याचे जन्मवर्ष कोणते ?

४) 'प्रेम' या कवितेचे कवी कोण आहेत ?

५) २१ वे शतक हे कशाचे शतक म्हणून ओळखले जाते ?

६) पुस्तकाच्या मागील बाजूस काय म्हणतात ?

७) संगणकाचा वापर कुठे केला जातो ?

८) इंटरनेटला मराठी प्रतिशब्द कोणता ?

----------------------------

----------------